*B.S.P's*
*Gomantak Ayurveda Mahavidyalaya & Research Centre*
*Vajem, Shiroda - Goa*

# भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

गोव्यतील एकमेव असलेले भारतीय संस्कृति प्रबोधिनीचे गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद - शिरोडा, महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन ३0 जानेवारी २0१९ रोजी फोंडा येथील राजीव गांधी कलामंदिरात उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला मुख्य अतीथी म्हणून दक्षिण गोव्याचे खासदार मा. ॲड. श्री. नरेंद्र सावईकर उस्थित होते. त्यांनी बोलतेवेळी आपण आयुर्वेदाच्या प्रगतीसाठी होईल तेवढी मदत करण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाचे विषेश अतिथी म्हणून गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. कृपाशंकर हे उपस्थित होते. त्यांनी आयुर्वेदाच्या प्रगतीसाठी आयुर्वेद व तंत्रज्ञानाने हातात हात घालून पुढे जाण्याची गरज असल्याचे सांगितले. संस्थेचे अध्यक्ष श्री. घाटे यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा अहवाल दिला. गोमंतक आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुरा प्र. बाळे यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने काही विशिष्ट पारीतोषिके देण्यात आली. यात अंतिम वर्ष आयुर्वेदाचार्य परिक्षेत प्रथम आल्याने कु. सिद्धि पलांडे हिला गौरविण्यात आले. अंतिम वर्ष आयुर्वेदाचार्य परीक्षेत मुलांमधे प्रथम कु. प्रथमेश कोटगी यालाही गौरविण्यात आले. त्याचबरोबर अंतिम वार्षातील विद्यार्थींनी कु. अक्षता शिवगण हीला उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला पाहुण्यांची ओळख डॉ. समीर मनोहर जोशी यांनी करून दिली. तर सुत्रसंचालन कु. प्रणेता ऊसगांवकर व कु. शिवानी डोग्रा यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. माधवी भट हीने केले.